# महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यांचा ग्रामीण—शहरी भागातील सामाजिक आणि आर्थिक निर्देशकांचा तुलनात्मक अभ्यास (२०११ — २०२१)

**संशोधन आखाड्याचा आकृतीबंध**

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

**पीएच.डी. पदवी अर्थशास्त्र विषय**


**~: संशोधक :~**

**प्रार्थना गुलाबराव कसबे**

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड, उपकेंद्र लातूर

**~: मार्गदर्शक :~**

**प्रा.डॉ.बी.पी. गाडेकर**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

राजर्षी शाहू महाविद्यालय, (स्वायत्त) लातूर


**~: शैक्षणिक वर्ष :~**

सन : २०२२ — २३

(जुलै — २०२२)

## १) प्रस्तावना:

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या ग्रामीण—शहरी भागातील जीवनमान उंचावण्यासाठी काही निर्देशकांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. २०११ आणि २०२१ या दोन जनगणनेचा विचार केला असता २०११ च्या जनगणनेवेळी महाराष्ट्रातील लोकसंख्या ११.४२ कोटी होती तर २०२१ चा विचार करता १२.४३ कोटी इतकी झाली आहे. म्हणून या वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करणे गरजेचे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचा एकूण दर हा ८२.३४% इतका होता. तर २०२१ च्या जनगणनेनुसार तो ८४.८% इतका आहे. जरी मागील जनगणनेच्या तुलनेत वाढ झाली असली तरी ती वाढ २ ते २.५% एवढीच आहे. तेव्हा साक्षरतेचा दर अधिकाधिक वाढवण्यासाठी जन साक्षरता अभियान ग्रामीण भागामध्ये साक्षरतेचे धडे देणे गरजेचे ठरते. अधिकाधिक जनजागृती तसेच अर्थसंकल्पामध्ये शिक्षणावर ६% खर्च करणे गरजे आहे. तो ६% इतका केला तर साक्षरतेचे प्रमाण वाढेल. याशिवाय ग्रामीण भागातील शाळेमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरवले तर साक्षरता दर वाढल्याशिवाय राहणार नाही.

२०१९ च्या कोविड प्रादुर्भावानंतर शासन आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने अधिक जागृत असल्याचे दिसून येते. तेव्हा हे आरोग्य सुधारण्यासाठी जनजागृती व प्रत्यक्षात अंमलबजावणी मोहीम ग्रामीण—शहरी भागात पोहचवणे गरजेचे आहे. त्यासाठी अस्तित्वात असलेल्या योजना, कृतिकार्यक्रमाशिवाय इतर योजनेची अंमलबजावणी करणेही गरजेचे आहे.

मराठवाड्याची लोकसंख्या १,८७,३१,८७२ इतकी असून लोकसंख्येची घनता ३५४ इतकी आहे. मराठवाडा विभागाची एकंदरीत साक्षरता पाहता ती ७६.२७ टक्के दिसून येते. तर लिंग गुणोत्तर प्रमाण ९३२ आहे.

## २) संशोधनाची गरज

सदर संशोधन अभ्यासामुळे महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यांत ग्रामीण—शहरी भागातील सामाजिक आणि आर्थिक निर्देशक जसे लोकसंख्या, लिंगगुणोत्तर, साक्षरता, दारिद्र्याचा अंदाज, आरोग्याचे निकष, कामगारांचा सहभाग या निर्देशकाचे सखोल ज्ञान घेवून त्यासंदर्भातील समस्यांचा शोध घेण्यासाठी संशोधन करणे गरजेचे आहे. सदर निर्देशकातील समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी संशोधन अभ्यास असायला हवा. वाढत्या लोकसंख्येला आळा बसविण्यासाठी विविध उपाययोजना करणे, साक्षरतेचे प्रमाण हे शहरी भागात अधिक आहे व ग्रामीण भागात कमी आहे. ते मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी प्रोत्साहन म्हणून विविध कृती कार्यक्रम राबवणे अपरिहार्य आहे. दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी सदर संशोधनाची गरज असल्याचे भासते. आर्थिक नियोजन करत असताना सदर सामाजिक व आर्थिक निर्देशकांचा आढावा घेणे अधिक परिणामकारक ठरते. सदर संशोधनामुळे सामाजिक आणि आर्थिक

निर्देशकांतील समस्या सोडवणे सोपे होईल, या हेतूने संशोधन करणे गरजेचे आहे.

### ३) संशोधनाचे महत्व

सदर संशोधन हे महाराष्ट्रातील मराठवाडा विभागामधील जिल्ह्यातील ग्रामीण—शहरी भागातील सर्वच घटकांच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. संशोधनात लक्षात घेतलेल्या लोकसंख्या, लिंग गुणोत्तर, साक्षरता, दारिद्र्याचा अंदाज, आरोग्याचे निकष, कामगारांचा सहभाग या निर्देशकांत योग्य तो विकास घडवून आणणे महत्वाचे आहे. ज्ञान प्राप्तीच्या दृष्टीने संशोधनाचे महत्व अपरिहार्य आहे. याशिवाय आर्थिक नियोजनात सदर निर्देशकांकडे अधिकाधिक परिणामकारकपणे पाहुन उपाययोजना सुचवणे महत्वाचे आहे.

### ४) समस्या विधान

महाराष्ट्रातील मराठवाडा विभागामधील ग्रामीण—शहरी भागातील सामाजिक आणि आर्थिक निर्देशकाचे आर्थिक विकासातील योगदान.

### ५) कार्यात्मक व्याख्या

**१) ग्रामीण**

गाव—खेड्यांचा भाग

**२) शहरी**

दाट लोकसंख्या असलेले भौगोलिक क्षेत्र

**३) सामाजिक**

मानवासह सामाजिक जीव एकत्रितपणे परस्पर संवादी लोकसंख्येमध्ये राहतात हा परिसंवाद सामाजिक मानला जातो.

**४) आर्थिक**

वित्तीय, अर्थविषयक, कमी खर्चाचे किंवा स्वस्त असा अर्थ होतो.

**५) निर्देशक**

अपेक्षित परिस्थिती दर्शविणारे घटक यांना निर्देशक असे संबोधिले जाते.

### ६) लोकसंख्या

विशिष्ट वेळी एखाद्या प्रदेशात असलेली लोकांची एकूण संख्या म्हणजे त्या प्रदेशाची **'लोकसंख्या'** होय.

### ७) साक्षरता

सात वर्षांवरील व्यक्ती जी कोणतीही एक भाषा वाचू अथवा लिहू शकते त्यास **'साक्षर'** असे म्हटले जाते.

संयुक्त राष्ट्र संघटनेनुसार लिहिता, वाचता येण्याची क्षमता म्हणजे **'साक्षरता'** होय.

### ८) लिंग गुणोत्तर

एखाद्या प्रदेशातील एकूण लोकसंख्येत दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या किती आहे यास **'लिंग गुणोत्तर'** म्हणतात.

### ६) गृहितके

१) महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

२) मराठवाड्यातील ग्रामीण भागाचा विकास श्रमशक्ती सहभाग दर, मानव विकास निर्देशांक इत्यादी विकासात्मक निर्देशकाच्या दृष्टीने कमी आहे.

३) मराठवाड्यातील शहरी भागात बाल लिंग गुणोत्तर व लिंग गुणोत्तराचे प्रमाण अधिक आहे.

४) साक्षरतेबाबत ग्रामीण व शहरी भागात जनजागृती झालेली आहे.

५) मराठवाड्यातील ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण शहरी भागापेक्षा तुलनेने अधिक आहे.

६) मराठवाड्यातील ग्रामीण—शहरी भागातील कामगारांच्या समस्येमध्ये तुलनात्मक दृष्ट्या तफावत दिसून येते.

### ७) संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) सामाजिक आणि आर्थिक निर्देशकाच्या आधारावर ग्रामीण—शहरी भागातील फरकाचे विश्लेषण करणे.

२) ग्रामीण—शहरी भागाचा विकासात्मक फरक अभ्यासणे.

३) ग्रामीण—शहरी भागातील बाललिंग गुणोत्तर, लिंग गुणोत्तर इत्यादींमधील तफावत अभ्यासणे.

४) ग्रामीण—शहरी भागातील कामगारांच्या समस्यांवर उकल काढणे.

५) ग्रामीण—शहरी भागातील दारिद्र्याचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचवणे.

## ८) संशोधनाची व्याप्ती

सदर संशोधन विषय हा राज्यस्तरावरील असल्यामुळे संशोधनाची व्याप्ती महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यांपुरती मर्यादित आहे.

## ९) संशोधनाची मर्यादा

सदर संशोधन करत असताना २०११—२०२१ या वर्षातील सांख्यिकीय माहितीचा विचार करून मराठवाड्यातील ग्रामीण—शहरी भागातील निर्देशकांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

## १०) संशोधन पध्दती

सदर संशोधन करत असताना विश्लेषनात्मक पध्दती, व्यक्ती अभ्यास पध्दती, यांचा अभ्यास केलेला आहे.

## ११) संशोधनाची साधने

प्रामुख्याने वर्तमानपत्रातील संदर्भ, अर्थशास्त्रातील विविध संदर्भग्रंथ, विविध वेबसाईट वरील माहितीचा आढावा, मागील संशोधनाचा आढावा, सदर संशोधनाच्या संबंधित शोधनिबंध अशा विविध द्वितियक स्वरूपातील माहिती साधनांचा उपयोग केला आहे. तसेच प्राथमिक तथ्य संकलनाकरीता प्रश्नावली व मुलाखतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

## १२) न्यादर्श/नमुना

सदरील संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलनाकरीता महारष्ट्रातील मराठवाडा हा विभाग निवडला आहे. त्याकरीता मराठवाड्यातील एकूण आठ जिल्ह्यातून सहेतुक यादृच्छीक नमुना निवडीद्वारे मराठवाड्यातील निवडक तालुक्यातील यादृच्छीत नमुना पध्दतीने (२५ तालुके) निवडक गावांतुन सहेतुक नमुना पध्दतीने प्रत्येकी २० कामगारांकडून असे एकूण ५०० नमुना निवडीद्वारे तथ्य संकलित करण्यात येणार आहे.

## १३) सांख्यिकीय परिमाण

सदर संशोधनात ग्रामीण—शहरी भागातील लोकसंख्या, साक्षरता, दारिद्र्य इत्यादींच्या संदर्भात सहसंबंध अभ्यासणे तसेच समाश्रयण रेषेद्वारे

(*Regression line*) तफावत तपासणे. तसेच विविध केंद्रीय प्रवृत्तीचे मापण यांचा उपयोग करून महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातून आठ जिल्ह्यांमधील ग्रामीण—शहरी भागातील निर्देशक तपासणे.

**१४) प्रकरण रचना**

१) प्रकरण पहिले — पार्श्वभूमी

- प्रस्तावना
- संशोधनाची गरज
- संशोधनाचे महत्व
- संशोधनाचे उद्दिष्ट्ये
- संशोधनाची गृहितके
- संशोधन पध्दती
- संशोधनाचा कालावधी इ.

२) प्रकरण दुसरे

- महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील ग्रामीण—शहरी भागाचा विकासात्मक अभ्यास

३) प्रकरण तिसरे

- महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील ग्रामीण—शहरी भागातील सामाजिक—आर्थिक निर्देशक

४) महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील ग्रामीण—शहरी भागातील लिंग गुणोत्तराचा अभ्यास

५) महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील ग्रामीण—शहरी कामगारांच्या समस्यांचा अभ्यास

६) महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील ग्रामीण—शहरी भागातील दारिद्र्याचा अभ्यास

७) महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील ग्रामीण—शहरी भागातील साक्षरतेचा अभ्यास

**१५) संदर्भ सूची**

१) *Government of India – Economic survey* (2011 – 12)

२) *Government of India – Economic survey* (2021 – 22)

३) भारतीय अर्थव्यवस्था — प्रा. रायखेलकर ए. आर., प्रा.डॉ.दामजी बी.एच. विद्याबुक्स पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद आवृत्ती २०१३

४) भारतीय अर्थव्यवस्था — किरण देसले, दिपस्तंभ पब्लिकेशन, जळगाव

५) महाराष्ट्राचा भूगोल — दिपक बाविस्कर, दिलीप पाटील, दिपस्तंभ पब्लिकेशन, जळगाव

६) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल : २०११—१२

७) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल : २०२१—२२

८) मराठवाड्यातील जिल्हानिहाय आर्थिक पाहणी अहवाल २०११—२०२१

**संशोधक विद्यार्थी**

**प्रार्थना गुलाबराव कसबे**

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वा.रा.ती.म.वि.नांदेड, उपकेंद्र लातूर

**मार्गदर्शक**

**डॉ.बी.पी. गाडेकर**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर